# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३८६/२०१९ दिनांक : ०९/११/२०१९**

**ईद-ए-मिलाद मिरवणुक दि.१०.११.२०१९ ऐवजी दि.२४.११.२०१९ रोजी निघणार असलेबाब.**

दि.१०.११.२०१९ रोजी ईद-ए-मिलादुन्नबी निमीत्त नांदेड शहरामध्ये मरकज-ए-मिलाद कमिटी तर्फे निजाम कॉलनी पासुन भव्य मिरवणुक काढण्यात येणार होती परंतु दि.०९.११.२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने आयोध्या येथील रामजन्मभूमी व बाबरी मस्जिद संदर्भाने दिलेल्या निकालाचे पार्श्वभुमीवर नांदेड शहरातील शांतता व सुव्यवस्था कायम रहावी यासाठी मरकज-ए-मिलाद कमिटीने पुढाकार घेवुन सर्व जमात सोबत चर्चा करुन दि.१०.११.२०१९ रोजीची मिरवणुक पुढे ढकलण्याबाबत निर्णय घेतला व त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात चालु असलेल्या बैठकीत येवून त्यांनी त्यांचा निर्णय मा.जिल्हादंडाधिकारी, नांदेड व मा.पोलीस अधिक्षक,नांदेड यांना कळविला आहे.

**(अण्णासाहेब पवार)**
सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४